**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः12.01.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

- राष्ट्रीय युवा दिनानिमित्त तीन हजार युवा नेत्यांसोबत आज पंतप्रधानांचा संवाद
- पुणे जिल्ह्यातील रांजणगांव इथं इलेक्ट्रानिक क्लस्टरची स्थापना करण्यात येणार

- जागतिक स्तरावर अव्वल राहात आपल्या वारशाचं सचोटीनं जतन करणं हे एफटीआयआयचं ब्रीदवाक्य असावं – केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांचं आवाहन
- पुण्यातील लष्कर दिन सोहोळ्यात नेपाळ लष्कराच्या वाद्यवृंदाचा प्रथमच सहभाग, आणि
- महिलांच्या खो-खो विश्वचषक स्पर्धेत बीडची प्रियंका इंगळे भारतीय संघाची कर्णधार

**राष्ट्रीय-युवा-दिन**

राष्ट्रीय युवा दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं तीन हजार युवा नेत्यांशी संवाद साधणार आहेत.दरवर्षी 12 जानेवारीला स्वामी

विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा दिन साजरा केला जातो. विकसित भारतासाठी 1 लाख तरुणांना राजकारणात सहभागी करून त्यांना राष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून देणं हा या संवादाचा उद्देश आहे. यावेळी तंत्रज्ञान, शाश्वतता, महिला सक्षमीकरण, उत्पादनं आणि शेती यासारख्या विषयांवर दहा उत्कृष्ट निबंधांच्या पुस्तकांचं प्रकाशन होणार आहे.

**विवेकानंद-जयंती**

स्वामी विवेकानंद जयंतीचं औचित्य साधून, माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्यूरो आणि विवेकानंद केंद्र, सोलापूर यांच्या वतीनं आजपासून १४ जानेवारी पर्यंत सामूहिक सूर्यनमस्कार, रक्तदान शिबिर, व्याख्यान, प्रश्नमंजुषा स्पर्धा आणि पुस्तक प्रदर्शन इत्यादी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**सीडॅक**

केंद्रिय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल पुण्यातील प्रगत संगणन विकास केंद्र अर्थात सीडॅक या संस्थेला भेट दिली. महासंगणक तंत्रज्ञान विकसनशीलतेच्या आणि अन्य औद्योगिक कंपन्यांना उपयुक्त इलेक्ट्रानिक उपकरणांच्या उत्पादनासाठी, आवश्यक चीप आणि अन्य तांत्रिक उपकरणांच्या विकासाच्या संदर्भात, सीडॅकमध्ये सुरू असलेल्या कामकाजाचा त्यांनी यावेळी आढावा घेतला. सीडॅकनं विकसित केलेल्या “तेजा जे ए एस 64” या चीपचं आणि नोवा डेव्हलपमेंट बोर्डचं उद्घाटन वैष्णव यांच्या हस्ते झालं. यानंतर बातमीदारांशी बोलताना अश्विनी वैष्णव म्हणाले की,

इलेक्ट्रॉनिक कंपन्यांना आवश्यक असलेल्या चीप्स आणि सेमीकंडक्टर्स विकसित करण्यासाठी, रांजणगांव इथं इलेक्ट्रानिक क्लस्टरची स्थापना करण्यात येणार आहे. त्यासाठी सहा हजार कोटी रूपयांची तरतूद केली आहे. पुणे नाशिक रेल्वेमार्गावरील नारायणगाव इथल्या  जीएमआरटी या आंतरराष्ट्रीय प्रयोगशाळेवर 23 देश अवलंबून असल्यानं, कोणत्याही परिस्थितीत ही वेधशाळा अन्य ठिकाणी हलवणार नाही अशी माहितीही  वैष्णव यांनी दिली. तंत्रज्ञान सामान्य लोकांपर्यंत पोहोचवणं हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं मुख्य उद्दिष्ट आहे. त्या दृष्टीने केंद्र सरकारनं पावलं उचलण्यास सुरवात केली आहे. तसंच तंत्रज्ञान विकासाच्या दृष्टीनं देशात पाच प्रयोगशाळाही विकसित करण्यात येणार असून, राष्ट्रीय महासंगणकीय मिशनही प्रगती पथावर आहे अशी माहिती त्यांनी दिली. या मिशननुसार महासंगणकातील पन्नास टक्क्यांहून अधिक उपकरणं भारतीय बनावटीची आहेत.

**वैष्णव-एफटीआयआय**

केंद्रीय माहिती आणि प्रसारण, रेल्वे तसंच इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल पुण्यातील भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या ऑडिटोरियमचं उद्घाटन केलं. उद्घाटनानंतर विद्यार्थी आणि प्राध्यापकांशी संवाद साधताना केंद्रीय मंत्र्यांनी एफटीआयआयला जागतिक स्तरावर आणखी पुढे नेण्याचं ध्येय असल्याचं स्पष्ट केलं.  वैष्णव यांनी प्रस्तावित अभिमत विद्यापीठ दर्जाच्या विविध पैलूंबाबत प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांचं निराकरण केलं. वैष्णव यांनी संस्थेच्या विविध सुविधांनाही भेट दिली. नव्या ऑडिटोरियममध्ये सिनेमा प्रोजेक्टर, सुसज्ज अत्याधुनिक ध्वनी यंत्रणा आणि  586 जणांसाठी आसन क्षमता आहे.

**गोखले - वैष्णव**

2047 पर्यंत भारताला विकसित करण्यासाठी पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक, उत्पादकता, कायद्यांची सुधारणा आणि सर्वसमावेशक विकास हे मुद्दे महत्त्वपूर्ण ठरतील असं प्रतिपादन केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी, काल पुण्यात गोखले अर्थशास्त्र संस्थेमध्ये आयोजित पुणे पब्लिक पॉलिसी फेस्टिवलच्या समारोप कार्यक्रमात बोलताना केलं. यावेळी वैष्णव यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून उपस्थितांशी संवाद साधताना, प्रामुख्यानं विकसित भारताचे चार स्तंभ या विषयाच्या अनुषंगानं मांडणी केली. केंद्र सरकारने दूरसंचार क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा आढावा त्यांनी घेतला. पुण्यात रेल्वे सेवा सुधारण्यासाठी नवीन स्थानकांबरोबरच, इतर सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचं सांगताना, यासाठी भरीव तरतूद करणार असल्याचंही त्यांनी यावेळी स्पष्ट केलं. दोन दिवस चाललेल्या महोत्सवात विविध क्षेत्रातील तज्ञ, उद्योजक, व्यवसायिक आणि विद्यार्थी सहभागी झाले होते.

**भाजप अधिवेशन**

अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी इथं आज भारतीय जनता पक्षाचं अधिवेशन होत आहे. यासाठी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि भाजपचे सर्व मंत्री, खासदार, आमदार, पक्षाचे पदाधिकारी तसंच जिल्ह्यातील कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. संध्याकाळी केंद्रीय मंत्री अमित शहांच्या भाषणानं या अधिवेशनाचा समारोप होईल. दरम्यान, पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्षपदी आमदार रवींद्र चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**लष्कर दिन**

77 व्या लष्कर दिनाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात आयोजित दक्षिण विभागाच्या सन्मान सोहोळ्यात, लष्कराच्या दक्षिण विभागाचे प्रमुख, लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांच्या हस्ते विविध पदकं देऊन, लष्करी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. तसंच या दिनाच्या संचलनाची रंगीत तालीम काल घेण्यात आली. पंधरा जानेवारीला होणाऱ्या लष्कर दिन सोहोळ्यात नेपाळ लष्कराचा वाद्यवृंद प्रथमच सहभागी होणार आहे. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**“लष्कर दिन सोहळ्यात 7 वाद्यवृंद सहभागी होणार असून नेपाळ लष्कर वाद्यवृंद चाही यामध्ये समावेश आहे. भारतीय लष्कर दिन सोहळ्यात सहभागी होण्यासाठी नेपाळ लष्करी वाद्यवृंद पुण्यात दाखल झाला आहे. 33 जणांच्या या वाद्यवृंद मध्ये 3 महिला संगीतकारांचा समावेश आहे. दोन्ही देशातील ऐतिहासिक लष्करी संबंधांचा भाग म्हणजे भारतीय लष्करातील गोरखा रेजिमेंट.भारतीय आणि नेपाळ लष्करा तर्फे दोन्ही देशांच्या लष्कर प्रमुखांना मानद जनरल पद बहाल करून नुकतंच सन्मानित करण्यात आलं. नोव्हेंबर महिन्यात भारतीय लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांना नेपाळ लष्कर तर्फे मानद जनरल पद बहाल करून गौरवण्यात आलं, तर डिसेंबर महिन्यात नेपाळ लष्कर प्रमुख जनरल अशोक राज सिगडल यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते मानद जनरल पद बहाल करून सन्मानित करण्यात आलं. दोन्ही देशातील मैत्रीपूर्ण संबंधांचा भाग म्हणून नेपाळ लष्करी वाद्यवृंद भारतीय लष्कर दिन सोहळ्यात सहभागी होणार आहे.**

## निधन

पुण्यातील गायक आणि संगीतकार राहुल घोरपडे यांचं अल्पशा आजारानं पुण्यात निधन झालं. राहुल घोरपडे यांनी संगीतकार म्हणून अनेक वर्ष काम केलं. पुण्यातील अनेक कार्यक्रमांमध्ये त्यांचा सहभाग होता.

## निधन

ज्येष्ठ पत्रकार, संगीत समीक्षक, लेखक मा. कृ. पारधी यांचं काल पहाटे पुण्यात निधन झालं. ते 104 वर्षांचे होते. मुंबईत दैनिक नवशक्ति, पुण्यात सकाळ, तरुण भारत आणि महाराष्ट्र हेराल्ड आणि दिल्ली इथं आकाशवाणीच्या वृत्तसेवा विभागात त्यांनी काम केलं. केंद्रीय माहिती सेवेतून ते 1978 मध्ये निवृत्त झाले. निवृत्तीनंतरही पारधी यांनी 2016 पर्यंत वृत्तपत्रीय समीक्षालेखन केलं.

## खोखो

भारतात होणाऱ्या महिलांच्या खो-खो विश्वचषकासाठी संघाची घोषणा करण्यात आली असून, संघाच्या कर्णधारपदी बीडच्या केज तालुक्यातील कळमंबा गावची प्रियंका इंगळे हिची संघाच्या कर्णधारपदी निवड झाली आहे. प्रियंका सध्या प्राप्ती कर सहाय्यक म्हणून कार्यरत असून क्रीडा अधिकारी परीक्षेतही ती उत्तीर्ण झाली आहे.

**हवामान**

उत्तर मध्य महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलका पाऊस आणि गडगडाटी वादळ होण्याची शक्यता आहे. उत्तर कोकण आणि मराठवाडा जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. अन्यत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**